E-Paper : www.vidharbhsatyajeet.in
सत्याचा शोध...बातमीची धार!
RNI-MAHMAR-2023/88726

दैनिक विदर्भ सत्यजीत
LIVE NEWS
विदर्भातील प्रत्येक बातमी... सर्वात आधी, सर्वात खरी!

प्रमुख मार्गदर्शक शौकत भाई शेख | मुख्य संपादक उध्दव श्रीराम फंगाळ मो.9511446111 / 9921746611 | कार्यकारी संपादक योगेश सौभागे

अचूक बातमी | निर्भीड पत्रकारिता | वेगवान अपडेट | जनतेचा विश्वास | सत्याच्या पथावर आम्ही सदैव

बुलढाणा, वर्ष ३ रे , अंक ३३७ वा , वार बुधवार ५ ऑगस्ट२०२६ पाने ३ किंमत ४ रुपये

# प्रारब्ध, प्रयत्न, आई-वडील आणि गुरु यांच्या आशीर्वादानेच माणूस आयुष्यात मोठा होतो ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर.

## माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य कीर्तनाला हजारो भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती.








मेहकर प्रारब्ध,प्रयत्न, आई-वडील आणि गुरू यांच्या आशीर्वादामुळेच माणूस त्याच्या आयुष्यात मोठा होतो,असे विचार हरिभक्त परायण निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी व्यक्त केले. माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मेहकर येथील छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक संकुलामध्ये आयोजित इंदुरीकर महाराज यांच्या कीर्तनामध्ये प्रबोधन करतांना त्यांनी वरील विचार व्यक्त केले. केंद्रीय आयुष आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव संजय रायमुलकर यांनी कार्यक्रमाच्या प्रारंभी इंदुरीकर महाराज यांचा पुष्पहार व भेटवस्तू देऊन सत्कार केला. माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांचे मेहकर लोणार तालुक्यात मोठ्या प्रमाणावर आयोजन करण्यात आले होते. निवृत्ती महाराज इंदुरीकर आपल्या कीर्तनामध्ये प्रबोधन करताना पुढे म्हणाले की, माणसाने स्वकर्तृत्व, परिश्रम याच्या भरवशावर मोठे झाले पाहिजे. कुठलीही पद प्रतिष्ठा मिळाल्यावर त्याचा अहंकार अंगी बनायला नको. ते पुढे



म्हणाले की, वयाच्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली. जगासाठी ज्ञानाचा दीप लावला. सख्खा भाऊ निवृत्तीनाथांना त्यांनी गुरु मानले. स्वतः ज्ञानेश्वर जगाची माऊली झाले. हे थोर पण सर्वश्रेष्ठ आहे. आज कालच्या काळात माणसं पैशावर प्रेम करतात. सोनं सोन्याचे सोनेपण सोडत नाही तसं संतही संतांचे संतत्व सोडत नाहीत. कापड धाग्याला आणि आई-वडील मुला-मुलींच्या प्रेमाला सोडत नाहीत,हे आपण लक्षात घेतले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य संस्थापक ठरले ते केवळ त्यांच्या कर्तृत्वामुळे. दुसऱ्याला लहान करून आपण मोठे होण्याचा कधीच प्रयत्न करू नये स्वतःच्या कर्तुत्वामुळे मोठे व्हावे,असेही आवाहन त्यांनी केले. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा इंदुरीकर महाराज यांनी यथोचित शब्दात गौरव केला. यावेळी राजश्रीताई जाधव, रंजनाताई रायमुलकर, शाल्मली रायमुलकर, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, भगवानराव सुलताने, शहर प्रमुख जयचंद बाठिया, पांडुरंग सरकटे, युवा सेनेचे नीरज रायमुलकर,भूषण घोडे,संदीप आल्हाट, नंदू बंगाळे त्याचप्रमाणे समाधान साबळे, प्रल्हाद सुलताने,धनंजय गायकवाड,नगरसेवक ओम सौभागे,मनोज जाधव, विशाल काबरा, अक्काताई गायकवाड, मोहन जाधव,दीपिकाताई रहाटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कीर्तनाला पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र वालूर येथे 'श्रीज्ञानेश्वरी चिंतन' सोहळा

## १३ ऑगस्ट पासून दररोज रात्री ९ वाजता कार्यक्रमाचे आयोजन




ता ४श्री गुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या आशीर्वादाने हा सोहळा सलग दुसऱ्या वर्षी भक्ती भावाने पार पडत आहे. या सोहळ्यात ह.भ.प. शंतनू महाराज पाठक (वालुरकर) हे श्री ज्ञानेश्वरीतील अध्यात्मिक आणि जीवनाला दिशा देणाऱ्या तत्त्वज्ञानावर निरूपण करणार आहेत. ज्ञानेश्वरीतील भक्ती आणि ज्ञानाचा संगम भाविकांपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. हा चिंतन सोहळा श्रावण शुद्ध प्रतिपदा १३ ऑगस्ट २०२६ पासून दररोज रात्री ९:00 ते १0:00 या वेळेत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरश्रीक्षेत्र वालूर येथे पार पडणार आहे. चातुर्मासाच्या या पावन पर्वावर सर्व वारकरी व धर्मा प्रेमी भाविकांनी या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन देगलूरकर वारकरी शिक्षण संस्था परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



# श्री रेणुकामाता, माहूर शक्तिपीठ आणि मळवटाची परंपरा




सिंदखेड राजा महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील माहूर हे भारतातील प्राचीन शक्तिउपासनेचे एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे. हे पवित्र क्षेत्र केवळ धार्मिक दृष्ट्याच नव्हे, तर ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि तात्त्विक दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. श्री रेणुकामातेचे हे प्राचीन मंदिर महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक म्हणून मान्यता प्राप्त आहे. भगवान परशुरामांची माता, महर्षी जमदग्नींची धर्मपत्नी आणि आदिमाया जगदंबेचे स्वरूप म्हणून श्री रेणुकामातेची उपासना अनेक शतकांपासून अखंड सुरू आहे.श्री रेणुकामातेच्या उपासनेतील विविध परंपरांमध्ये मळवट अर्पण करण्याची परंपरा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते. ही परंपरा केवळ धार्मिक विधी नसून मातृशक्ती, अखंड सौभाग्य, संरक्षण, कुलसंस्कृती आणि भक्ताच्या संपूर्ण समर्पणाची प्रतीकात्मक अभिव्यक्ती आहे.श्री रेणुकामाता : आदिशक्तीचे मातृस्वरूपरेणुकामाता ही भारतीय शक्तिपरंपरेतील अत्यंत प्राचीन मातृदेवता आहे. पुराणांमध्ये ती महर्षी जमदग्नींची पत्नी आणि भगवान परशुरामांची माता म्हणून वर्णिली असली, तरी शाक्त परंपरेत तिचे स्वरूप केवळ ऐतिहासिक किंवा पौराणिक व्यक्तिमत्त्वापुरते मर्यादित नाही. ती आदिमाया, जगज्जननी, विश्वमाता आणि सर्व जीवांचे रक्षण करणारी करुणामयी शक्ती म्हणून पूजली जाते.माहूर येथे विराजमान असलेली रेणुकामाता भक्तांसाठी कुलस्वामिनी, ग्रामदेवता आणि शक्तिस्वरूप माता आहे. तिच्या दर्शनाने भय दूर होते, संकटांचे निवारण होते आणि जीवनात मंगलतेचा उदय होतो, अशी भक्तांची श्रद्धा आहे.माहूर शक्तिपीठाचे धार्मिक महत्त्वमाहूर हे प्राचीन काळी मातापूर या नावाने प्रसिद्ध होते. येथे श्री रेणुकामातेसह श्री दत्तात्रेय, महासती अनसूया आणि परशुराम यांची मंदिरे तसेच इतर अनेक पवित्र स्थळे असल्यामुळे हे क्षेत्र अद्वितीय धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे माहूर हे शक्ती, दत्त आणि ऋषीपरंपरा यांचा त्रिवेणी संगम मानला जातो.नवरात्र, चैत्रोत्सव, पौर्णिमा आणि विविध यात्रांच्या काळात लाखो भाविक येथे येऊन देवीचे दर्शन घेतात. या उपासनेत मळवट अर्पण करण्याची परंपरा विशेष महत्त्वाने पाळली जाते.मळवटाची परंपराश्री रेणुकामातेला मळवट अर्पण करणे म्हणजे देवीच्या भांगात कुंकू अर्पण करून तिच्या अखंड मंगलस्वरूपाचा गौरव करणे होय.भारतीय संस्कृतीत भांगातील कुंकू हे विवाहित स्त्रीच्या अखंड सौभाग्याचे प्रतीक आहे. परंतु देवीच्या बाबतीत मळवटाचा अर्थ अधिक व्यापक आहे. तो तिच्या नित्यशक्तीचा, विश्वनिर्मितीच्या सामर्थ्याचा आणि सर्व जीवांचे संरक्षण करणाऱ्या मातृभावाचा प्रतीकात्मक आविष्कार आहे.माहूर येथे अनेक भक्त नवसपूर्तीनंतर मळवट अर्पण करतात. काही कुटुंबांमध्ये कुलाचाराचा भाग म्हणून प्रत्येक वर्षी देवीला मळवट वाहण्याची परंपरा आहे. नवविवाहित दांपत्य, सुवासिनी स्त्रिया तसेच संपूर्ण कुटुंब देवीच्या चरणी मळवट अर्पण करून अखंड सौभाग्य, आरोग्य, संतती, समृद्धी आणि कुलकल्याणाची प्रार्थना करतात.मळवटाचे तात्त्विक महत्त्वशाक्त तत्त्वज्ञानानुसार देवी ही विश्वातील सर्व क्रियाशक्तीचे मूळ आहे. तिच्या मस्तकावरील मळवट हा त्या जागृत शक्तीचा दृश्यमान संकेत आहे.मळवटातील लाल रंग हा केवळ रंग नसून तो जीवन, रक्त,



चेतना, ऊर्जा, मातृत्व, त्याग, पराक्रम आणि विजय यांचे प्रतीक आहे. त्यामुळे देवीला मळवट अर्पण करणे म्हणजे विश्वाला संचालित करणाऱ्या आदिशक्तीला आपल्या श्रद्धेचा नम्र अर्पण करणे होय.कुलस्वामिनी आणि मळवटमहाराष्ट्रातील असंख्य कुटुंबांची कुलस्वामिनी श्री रेणुकामाता आहे. कुलाचारामध्ये देवीला ओटी, हळद, कुंकू, साडी, खण, नारळ यांसह मळवट अर्पण करण्याची परंपरा विशेष महत्त्वाची मानली जाते.या विधीत भक्त स्वतःचे अहंकार, दुःख, चिंता आणि जीवनातील सर्व जबाबदाऱ्या मातेसमोर समर्पित करतो. म्हणून मळवट ही केवळ पूजेची सामग्री नसून भक्त आणि देवी यांच्यातील आध्यात्मिक नात्याचे प्रतीक आहे.लोकपरंपरेतील स्थानमाहूर परिसरात मळवटाशी संबंधित अनेक लोकपरंपरा आजही जिवंत आहेत. नवरात्रोत्सवात सुवासिनी स्त्रिया देवीला कुंकू अर्पण करून आपल्या कुटुंबाच्या मंगलतेची प्रार्थना करतात. चैत्रोत्सव, यात्रोत्सव आणि विशेष धार्मिक प्रसंगी देवीच्या मळवटाचे दर्शन अत्यंत शुभ मानले जाते.लोकमान्यतेनुसार देवीचा मळवट हा तिच्या कृपेचा आणि जागृत उपस्थितीचा संकेत मानला जातो. त्यामुळे भक्त अत्यंत श्रद्धेने हा विधी पार पाडतात.आध्यात्मिक अर्थमळवट अर्पण करणे म्हणजे स्वतःचे मन, बुद्धी, अहंकार आणि जीवन देवीच्या चरणी अर्पण करणे. हा विधी भक्ताला समर्पण, नम्रता, श्रद्धा आणि अंतःकरणशुद्धीची अनुभूती देतो.रेणुकामातेच्या मळवटाचे दर्शन घेताना भक्ताला केवळ मूर्तीचे दर्शन होत नाही; तर आदिशक्तीच्या मातृमय करुणेचा आणि संरक्षणाचा अनुभव येतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे.निष्कर्षश्री रेणुकामाता, माहूर शक्तिपीठ आणि मळवटाची परंपरा या एकमेकांपासून वेगळ्या नसून भारतीय शक्तिउपासनेच्या अखंड परंपरेचे अविभाज्य घटक आहेत. मळवट हा देवीच्या अखंड सौभाग्याचा, विश्वमातेच्या करुणेचा, सर्जनशक्तीचा आणि भक्तरक्षणाच्या दिव्य संकल्पाचा मंगल प्रतीक आहे.आजच्या आधुनिक युगातही ही परंपरा लाखो भक्तांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. श्री रेणुकामातेच्या चरणी अर्पण केलेला मळवट भक्ताला आपल्या कुलसंस्कृतीची आठवण करून देतो, मातृशक्तीशी नाते दृढ करतो आणि जीवनात श्रद्धा, धैर्य, संयम व मंगलतेची प्रेरणा देतो.----

# आर्ट ऑफ लिविंग आनंद अनुभूती शिबिर उत्साहात





ता ४सेलू शहरात गुरुपौर्णिमेनिमित्त दिनांक २१ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान आर्ट ऑफ लिविंगतर्फे आयोजित आनंद अनुभूती शिबिराचा उत्साह पूर्ण वातावरणात समारोप झाला. या शिबिरात आर्ट ऑफ लिविंगचे प्रशिक्षक किशोर घडे व अंकुश गरड यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. शिबिरादरम्यान तणावमुक्त आणि आनंदी जीवन कसे जगावे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शिबिर पूर्ण केल्यानंतर मनातील अनामिक भीती दूर झाली असून आत्मविश्वास खूप वाढला आहेअशा भावना शिबिरार्थींनी व्यक्त केल्या. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संजय ठाकूर रामा वैद्य मनीषा वैद्य हर्षदा चेचेडिया बाळासाहेब सोनटक्के ज्ञानेश्वर मोगल आदींनी विशेष परिश्रम घेतले.




# माळी महासंघ पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती प्रक्रियेला प्रारंभ

...परतूरप्रतिनिधी हनुमंत दवंडे , दि. ३ ऑगस्ट : माळी महासंघ, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने जालना जिल्ह्यात संघटन विस्ताराला गती देण्यासाठी नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. अविनाश भाऊ ठाकरे यांच्या आदेशानुसार, प्रदेशाध्यक्ष मा. श्री. अरुणजी तिखे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मराठवाडा विभागीय अध्यक्ष मा. श्री. दत्तात्रय जाधव यांच्या नेतृत्वात ही प्रक्रिया राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष संतोष मच्छिंद्र रासवे यांनी दिली.जिल्ह्यात संघटना अधिक सक्षम, प्रभावी आणि सर्वसमावेशक करण्याच्या उद्देशाने विविध पदांसाठी पात्र, प्रामाणिक, समाजहिताची जाणीव असलेले आणि संघटन कौशल्य असलेल्या कार्यकर्त्यांना संधी देण्यात येणार आहे. यामध्ये सर्व आघाड्यांचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष तसेच युवक, महिला, युवती, शेतकरी आघाड्यांसह महासंघाच्या विविध आघाड्यांवरील पदांची नियुक्ती केली जाणार आहे.जालना जिल्ह्यातील सर्व समाजबांधव, ज्येष्ठ मार्गदर्शक, पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक यांनी आपल्या परिसरातील समाजकार्यात सक्रिय, चारित्र्यसंपन्न, कर्तव्यदक्ष आणि समाजहितासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या योग्य व्यक्तींची नावे व संपर्क क्रमांक महासंघाकडे पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.प्राप्त झालेल्या नावांची योग्य पडताळणी करून पात्र, सक्षम व संघटनप्रिय व्यक्तींना जबाबदारी सोपविण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष संतोष मच्छिंद्र रासवे यांनी स्पष्ट केले.माळी समाजाची संघटनात्मक ताकद वाढवून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम नेतृत्व निर्माण करण्याच्या दृष्टीने ही नियुक्ती प्रक्रिया महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# तळेगाव दिंडोरी येथे शहीद यशवंत ढाकणे यांचा २५ वा शहीद दिन उत्साहात साजरा




नाशिक दिंडोरी तालुक्यातील तळेगाव दिंडोरी येथे शहीद यशवंत ढाकणे यांचा २५ वा शहीद दिन अत्यंत देशभक्तीपूर्ण वातावरणात व मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे होते.मुख्य कार्यक्रमाची सुरुवात वीर माता,वीर पिताअर्जुन दादा ढाकणे व बबुबाई ढाकणे,वीर बंधू-भगिनी तसेच मान्यवरांच्या हस्ते शहीद स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून झाली.यानंतर मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व ध्वजगीत सादर केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना दिंडोरी तालुका माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष भारत खांदवे म्हणाले,''तळेगाव ग्रामस्थ गेली २५ वर्षे हा दिवस केवळ शहीद दिन न मानता एका राष्ट्रीय सणासारखा साजरा करतात.'' आपल्या अध्यक्षीय भाषणात गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे म्हणाले,''आज आपण सर्वजण सैनिकांच्या आत्मत्यागामुळेच सुरक्षित आहोत.देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांचा आदर करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.''सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान राखोंडे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे शहीद ढाकणे यांच्या '१५ मराठा बटालियन'चे ऑन-ड्युटी जवान व अधिकारी आवर्जून उपस्थित होते. सब रजिस्ट्रार संदीप भुसारी, आरोग्य अधिकारी डॉ.निलेश ठाकरे,प्रा.शरद शेजवळ, तळेगावचे सरपंच सोनाली चारोस्कर उपसरपंच प्रवीण कथार,पोलीस पाटील रोशन परदेशी,ग्रामविकास अधिकारी अमोल शिंदे आदी सह , ग्रामस्थ, शिक्षक,विद्यार्थी आणि दिंडोरी तालुका माजी सैनिक परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमादरम्यान उन्नती माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनीने सादर केलेल्या 'मराठा स्मृती गीताने 'उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुदाम अण्णा ढाकणे यांनी केले, तर ग्रामपंचायत अधिकारी अमोल शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.'शहीद यशवंत ढाकणे अमर रहे'आणि 'भारत माता की जय'च्या घोषणांनी परिसर




दुमदुमून गेला होता. आरोग्य विभागाच्या महिलांनी मराठा बटालियनच्या जवानांना राखी बांधून त्यांचे औक्षणं केले. जवानांनी या महिला भगिनींना पेढे वाटप केले.व माजी सैनिक परिवार संघाच्या वतीने सर्व महिलांना सन्मानपत्र देण्यात आले.यावेळीबमाजी सैनिक संजय ठुबे, भारत नागरे उत्तम बुनगे,समाधान धात्रक,चंद्रभान कळमकर,भिका ईचाळे,बाळू गीते,शिवाजी निसाळ तारकेश्वर भामरे सह मोठ्या संख्येने आजी-माजी सैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुक्यातील तळेगाव, पालखेड,पिंपळणारे मडकीजांब, रासेगाव,आशेवाडी ,ढकांबे ,दिंडोरीव्ही एन नाईक कॉलेज दिंडोरी, येथील शाळेत यशवंत ढाकणे यांच्या प्रतिमेस पूजन करून शहीद दिवस साजरा करण्यात आला.व दिंडोरी तालुका माजी सैनिक परिवार संघाच्यावतीने इयत्ता १0वी मध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# पालखेड बंधारा शाळेचे शिक्षक अमोल पवार यांना दिंडोरी केंद्राचा ज्ञानरत्न पुरस्कार




नाशिक दिंडोरी तालुक्यातील पालखेड बंधारा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळाचे उपक्रमशील शिक्षक अमोल पवार यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद,प्राथमिक विभाग यांच्यावतीने दिला जाणारा 'ज्ञानरत्न पुरस्कार' ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त जाहीर झाला होता.त्याचे वितरण २ ऑगस्ट रोजी नाशिक येथे संस्थापक तथा विधानसभा आमदार संजय केळकर खासदार भास्कर भगरे माणिकराव ठाकरे आणि मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती व शाळेच्या वतीने अमोल पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या सत्कार सोहळ्याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते बापू (तात्या) चव्हाण



यांनी सांगितले की शैक्षणिक क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम,विद्यार्थीकेंद्रित अध्यापन, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सातत्याने केलेले प्रयत्न,उत्कृष्ट सूत्रसंचालक तसेच सामाजिक व शैक्षणिक कार्यातील उल्लेखनीय योगदान त्याची पावती म्हणजेच पवार सरांचे काम त्याची ही पावती आहे असे सांगितले. यावेळी मुख्याध्यापक प्रवीण खैरनार यांनी आपले मनोगत व्यक्त करून अमोल पवार यांनी केलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या पुरस्काराबद्दल शिक्षण क्षेत्रातील मान्यवर,सहकारी शिक्षक,ग्रामस्थ,पालक व विद्यार्थ्यांनी पवार यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या त्यांच्या या यशामुळे पालखेड बंधारा गावाचा व शाळेचा नाव नावलौकिक वाढवला आहे.

# सहाय्यक निबंधक, कारंजा यांचा ॲक्शन मोड ऑन .

## प्रशिक पतसंस्थेला ठेवी ७ऑगस्ट पर्यन्त परत करण्याचे आदेश .ठेवी परत न केल्यास कठोर कारवाईचा इशारा




कारंजा प्रतिनिधी :कारंजा येथील प्रशिक ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्यादित विरोधात ठेवीदारांच्या वाढत्या तक्रारींची गंभीर दखल घेत सहकार विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. ठेवीदारांच्या अडकलेल्या ठेवींप्रकरणी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कारंजा यांनी संस्थेचे अध्यक्ष, व्यवस्थापक व संचालक मंडळाला ठेवीदारांची रक्कम तातडीने परत करण्याचे निर्देश देत, मुदतीत समाधानकारक कार्यवाही न झाल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.यासंदर्भातील अधिकृत पत्र ३० जुलै २०२६ रोजी संबंधित पतसंस्थेला बजावण्यात आल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. या पत्रानुसार संस्थेला सर्व ठेवीदारांची अद्ययावत यादी, थकीत ठेवींचा तपशील, परतफेडीची सद्यस्थिती, संस्थेची आर्थिक स्थिती तसेच पुढील कार्यवाहीचा सविस्तर अहवाल ७ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.दरम्यान, मुदतपूर्ती होऊनही ठेवी परत मिळत नसल्याच्या तक्रारींमुळे ठेवीदारांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, लहान व्यावसायिक आणि कामगारांनी आयुष्यभराची बचत या संस्थेत ठेवली असून, वारंवार पाठपुरावा करूनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.या प्रकरणी नगरसेवक सागर रामदास अंभोरे, ॲड. मिलिंद खंडारे, ॲड. राहुल मनवर, विलास शिरसाट, भाऊराव वासनिक, पुरुषोत्तम गुजाटे यांच्यासह शेकडो ठेवीदारांनी सहकार विभागाकडे संयुक्त निवेदन सादर करून संस्थेच्या कारभाराची सखोल चौकशी करावी व ठेवीदारांचे पैसे तातडीने परत मिळवून द्यावेत, अशी मागणी केली आहे.प्रशासनाकडून ठोस निर्णय न झाल्यास १५ ऑगस्ट २०२६ पासून कारंजा तहसील कार्यालयासमोर सामूहिक आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा ठेवीदारांनी दिला आहे. या आंदोलनात शंभरहून अधिक ठेवीदार सहभागी होण्याची शक्यता असून, ''आमचे पैसे परत मिळेपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही,'' अशी भूमिका ठेवीदारांनी स्पष्ट केली आहे. सभासदांच्या आमरण उपोषणाच्या इशाऱ्यानंतर सहाय्यक निबंधक कारंजा (लाड) कमालीचे सक्रिय झालेत. सहाय्यक निबंधकांनी आपल्या आदेशात सहकारी संस्थांचे कामकाज पारदर्शक ठेवणे आणि ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करणे ही संचालक मंडळाची मूलभूत जबाबदारी असल्याचे नमूद केले आहे. तक्रारींच्या पार्श्वभूमीवर आवश्यकतेनुसार संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी, विशेष लेखापरीक्षण (स्पेशल ऑडिट), जबाबदार पदाधिकाऱ्यांवर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करणे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमांतर्गत दंडात्मक कारवाई तसेच पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येऊ शकते, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.



तसेच मागविलेली माहिती वेळेत न देणे किंवा दिशाभूल करणारी माहिती सादर करणे ही गंभीर बाब मानली जाईल, असा इशाराही पत्रात देण्यात आला आहे.या संपूर्ण प्रकरणामुळे कारंजा शहरासह तालुक्यात ठेवीदारांच्या पैशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, विविध सामाजिक संघटना व नागरिकांनी या प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.आता सहकार विभागाने दिलेली ७ ऑगस्टची मुदत आणि ठेवीदारांनी जाहीर केलेले १५ ऑगस्टपासूनचे आमरण उपोषण यामुळे पुढील काही दिवस निर्णायक ठरणार आहेत. संस्थेकडून समाधानकारक पावले उचलली जातात की सहकार विभाग आणखी कठोर कारवाई करतो, याकडे संपूर्ण कारंजा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# बसस्थानक परिसरात पोलिसांचा धडक ॲक्शन; १०० हून अधिक वाहनांवर कारवाई




पैठण महिला, विद्यार्थिनी आणि प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत पैठण शहरातील एसटी बसस्थानक परिसरात पोलिसांनी विशेष तपासणी मोहीम राबवून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर धडक कारवाई केली. या मोहिमेत १०० हून अधिक वाहनांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात आली.पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत बसस्थानक परिसरात अचानक तपासणी करण्यात आली. शाळा, महाविद्यालये आणि हायस्कूल सुटण्याच्या वेळेत या परिसरात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व महिला प्रवासी ये-जा करतात. याच गर्दीचा गैरफायदा घेत रोड रोमिओंकडून टवाळखोरी, दुचाकींवर कसरती, ट्रिपल सीट प्रवास, कर्णकर्कश सायलेन्सरचा वापर आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या.या पार्श्वभूमीवर पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेत नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई केली. मोहिमेदरम्यान ट्रिपल सीट, विनाकारण फिरणारे तरुण, धोकादायक पद्धतीने वाहन चालविणारे तसेच महिलांची छेडछाड करणाऱ्यांवर विशेष लक्ष ठेवण्यात आले.महिला व विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीने अशा प्रकारच्या विशेष मोहिमा यापुढेही सातत्याने राबविण्यात येणार असून, वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाने नागरिकांना केले आहे.



# जयकवाडी धरणाचे १८ दरवाजे उघडले; गोदावरीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा




पैठण // नाथसागर अर्थात जयकवाडी धरणातील पाणीसाठा वाढल्याने मंगळवारी सायंकाळी ६ ते ६.३० वाजण्याच्या दरम्यान धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. त्यानंतर धरणाचे १८ दरवाजे उघडून गोदावरी नदीपात्रात पाणी सोडण्यात आले.धरणातून विसर्ग सुरू झाल्याने गोदावरी नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. नदीपात्रात अनावश्यक वावर टाळावा, जनावरे तसेच शेतीची उपकरणे सुरक्षित ठिकाणी हलवावीत आणि नदीकाठच्या नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.पाटबंधारे विभागाकडून विसर्गाच्या प्रमाणावर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून, आवश्यकतेनुसार विसर्गात बदल केला जाणार आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.




# जिजाऊ संस्थेकडून अघई केंद्रातील ११ शाळांमध्ये १,४०० विद्यार्थ्यांना ४,५०० मोफत वह्यांचे वितरण




शहापूर शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत हक्क असून आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, या सामाजिक भावनेतून जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था, महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे यांच्या संकल्पनेतून संपूर्ण कोकणात ३५ लाख मोफत वही वाटप अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शहापूर तालुक्यातील अघई केंद्रातील ११ शाळांमध्ये मोफत वही वाटप कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.या उपक्रमामध्ये टहारपूर हायस्कूल, टहारपूर जिल्हा परिषद शाळा, वाघिवली, नेवरे, डिंभे, ठाकूरपाडा, मोहिली, चिंचपाडा, भावसे, खोस्ते, बीबीचापाडा, भुईशेत, गरेलपाडा, चक्कीचापाडा, पेंढरी, पारेला, चराचापाडा, बोराला आणि अघई येथील सुमारे १,४०० विद्यार्थ्यांना जवळपास ४,५०० मोफत वह्यांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी या सामाजिक उपक्रमाचे मनापासून स्वागत करत जिजाऊ संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी जिजाऊ संघटनेचे कार्याध्यक्ष धीरज सांबरे, जिजाऊ संघटना शहापूर अध्यक्ष तथा रत्नागिरी संपर्क प्रमुख दिनेश निमसे, जिजाऊ संस्थेचे सुदर्शन पाटील, किशोर धसाडे, सुनील निपुर्त, जयवंत गोदडे, विनोद निमसे, यशवंत वाख, आशिष कटारे तसेच जिजाऊ संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना दिनेश निमसे म्हणाले, ''निलेश सांबरे यांच्या नेतृत्वाखाली जिजाऊ संस्था शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात सातत्याने लोकाभिमुख उपक्रम राबवत आहे. वही वाटप हा केवळ साहित्य वितरणाचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया मजबूत करण्याचा संकल्प आहे. शहापूर तालुक्यातील एकही विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, हा संस्थेचा निर्धार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अधिकारी बनण्याचे स्वप्न पाहिले आहे, त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य जिजाऊ संस्था करेल. विद्यार्थ्यांनी केवळ जिद्द, मेहनत आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे.''यावेळी सुदर्शन पाटील यांनी सांगितले की, शहापूर तालुक्यातील उर्वरित सर्व शाळांमध्येही पुढील काही दिवसांत मोफत वही वाटप अभियान पूर्ण करण्यात येणार असून हजारो विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळणार आहे. शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या या अभियानामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होत असून जिजाऊ संस्थेचे हे



कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.